आकाशवाणी पुणे
प्रादेशिक वृत्त विभाग
पुणे वृत्तांत
वेळ- संध्याकाळी 06.00 वा.

दिनांक : 07.11.2026 वार : शनिवार

'वन्दे मातरम्'

'वन्दे मातरम्' या राष्ट्रीय गीताच्या १५१ वर्षपूर्तीनिमित्त पुणे महापालिकेतर्फे आज सायंकाळी सहा वाजता शनिवारवाडा प्रांगणात दीपप्रज्वलन सोहळा आयोजित करण्यात आला आहे. या वेळी ३६ हजार दिवे प्रज्वलित करून विश्वविक्रमाचा प्रयत्न केला जाणार आहे. देशासाठी वीरमरण पत्करलेल्या जवानांच्या ५० वीरनारींचा सन्मानही यावेळी करण्यात येणार आहे. लष्करी बँडचं वादन आणि 'वन्दे मातरम्' गीताचं सादरीकरण हे सोहळ्याचं वैशिष्ट्य असेल, अशी माहिती महापौर मंजुषा नागपुरे यांनी दिली आहे.

सावित्री हाट

महिला बचत गटांच्या उत्पादनांना कायमस्वरूपी बाजारपेठ उपलब्ध करून देण्यासाठी पुणे जिल्हा परिषदेकडून 'सावित्री हाट' उभारण्यात येणार आहे. जिल्हा परिषदेच्या जुन्या इमारतीतील दर्शनी भागात हे विक्री दालन सुरू करण्यात येणार असून महिलांच्या आर्थिक सक्षमीकरणासाठी हा उपक्रम महत्त्वपूर्ण ठरेल, असा विश्वास जिल्हा परिषदेचे अध्यक्ष वीरधवल जगदाळे आणि मुख्य कार्यकारी अधिकारी गजानन पाटील यांनी व्यक्त केला आहे.

शवागार कर्मचारी

दिवाळी ऊत्सवाच्या निमित्तानं एरंडवणे परिसरातील सात गणपती मंडळांतर्फे ससून रुग्णालयातील शवागारामध्ये मृतदेहांची सेवा करणाऱ्या कर्मचाऱ्यांविषयी कृतज्ञता व्यक्त करत त्यांचा आज सन्मान करण्यात आला. शवागारातील १२ कर्मचाऱ्यांचा प्रत्येकी पाच लाख रुपयांचा आरोग्य विमा काढण्यात आला असून त्याचं प्रमाणपत्र या वेळी सुपूर्द करण्यात आलं.

खासगी बसभाडे

दिवाळीच्या सुट्ट्यांमध्ये प्रवाशांकडून जादा भाडे आकारणाऱ्या खासगी बसचालकांविरोधात पुणे आणि पिंपरी-चिंचवड प्रादेशिक परिवहन कार्यालयानं विशेष तपासणी मोहीम सुरू केली आहे. खाजगी बसद्वारा जादा भाडं आकारल्यास प्रवाशांनी तिकिटाचा फोटो आणि स्वतःचा मोबाईल क्रमांकासह पुणे आरटीओच्या ८२ ७५ ३३ ०१ ०१ या क्रमांकावर तक्रार करावी, असं आवाहन आरटीओ प्रशासनानं केलं आहे.

बांधकाम-अटी

दिवाळीच्या सुटीत बांधकामं आणि विकासकामं सुरू ठेवण्यासाठी पुणे महापालिकेनं १६ अटी नमूद केल्या आहेत. शहर अभियंता अनिरुद्ध पावसकर यांनी याबाबतचे आदेश दिले आहेत. अधिकाऱ्यांनी कामांची प्रत्यक्ष पाहणी करायची असून, पुरेसे कामगार किंवा सुरक्षा साधनं उपलब्ध नसल्यास काम तातडीनं बंद करण्याच्या सूचना देण्यात आल्या आहेत. अटींचं पालन न करणाऱ्यांवर कारवाई केली जाणार असल्याचं पावसकर यांनी स्पष्ट केलं.

आंबेडकर-शाळाप्रवेश

भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या शाळा प्रवेश दिनानिमित्त पुणे महापालिकेतर्फे आज शहरभर विद्यार्थी दिन साजरा करण्यात आला.

महापालिकेच्या प्राथमिक आणि माध्यमिक शाळांमध्ये संविधानाच्या उद्देशिकेचं सामूहिक वाचन तसंच निबंध, वक्तृत्व आणि चित्रकला स्पर्धांसह विविध उपक्रम घेण्यात आले. या उपक्रमांसाठी स्वतंत्र निधीची तरतूद केल्याची माहिती स्थायी समितीचे अध्यक्ष श्रीनाथ भिमाले यांनी दिली.

ऊसगाळप

राज्यातील २०२६-२७ चा ऊस गाळप हंगाम वेग घेत असून, आतापर्यंत १३८ सहकारी आणि खासगी साखर कारखान्यांनी आतापर्यंत १३२ लाख ७ हजार टन उसाचं गाळप केलं आहे. पश्चिम महाराष्ट्रातील शेतकरी संघटनांचं आंदोलन स्थगित झाल्यानं सातारा, सांगली आणि कोल्हापूर जिल्ह्यांतील कारखाने सुरू होण्याचं प्रमाण वाढण्याची शक्यता आहे. पुणे विभागानं गाळप आणि साखर उत्पादनात आघाडी घेतली आहे. या विभागातील २७ कारखान्यांनी ३७ लाख टन उसाचं गाळप केलं असून, सरासरी ८ पूर्णांक ९१ टक्के उताऱ्यानुसार ३३ लाख क्विंटल साखरेचं उत्पादन घेतलं आहे.

अन्न आणि औषध प्रशासन

दिवाळीच्या पार्श्वभूमीवर अन्न आणि औषध प्रशासनानं खाद्य पदार्थांतील भेसळ रोखण्यासाठी कारवाई सुरू केली आहे. पुणे, पिंपरी-चिंचवड, सातारा आणि कोल्हापूर इथं काल करण्यात आलेल्या कारवाईत साधारण १४ लाख ८७ हजार २९० रुपये किमतीच्या एकंदर पाच हजार १९९ किलो खाद्यपदार्थांचा साठा जप्त करण्यात आला आहे. अन्न आणि औषध प्रशासनाचे सहआयुक्त श्रीकांत करकळे यांनी ही माहिती दिली.

मेट्रो-वेळापत्रक

लक्ष्मीपूजनानिमित्त पुणे मेट्रोच्या वेळापत्रकात बदल करण्यात आला आहे. स्वारगेट ते पिंपरी-चिंचवड आणि वनाझ ते रामवाडी मेट्रो मार्गिके वरील सेवा उद्या सकाळी ६ ते सायंकाळी ६ या वेळेतच सुरू राहणार आहे. सायंकाळी ६ ते रात्री ११ या वेळेत मेट्रो सेवा पूर्णपणे बंद राहणार असून हिंजवडी ते जिल्हा न्यायालय या मार्गिकेवरील मेट्रोच्या वेळापत्रकात कोणताही बदल करण्यात आलेला नाही. परवापासून मेट्रोसेवा नेहमीप्रमाणेच सुरू राहील. प्रवाशांनी या बदलाची नोंद घेण्याचं आवाहन मेट्रो प्रशासनानं केलं आहे.

मुख्यमंत्री समृद्ध

मुख्यमंत्री समृद्ध पंचायतराज अभियान २०२५-२६ अंतर्गत पुणे जिल्ह्यातील काळवाडी ग्रामपंचायतीनं उल्लेखनीय कामगिरी केली आहे. पुणे विभागीय स्तरावर ग्रामपंचायतीनं तृतीय क्रमांक पटकावला असून, राज्य शासनाकडून ६० लाख रुपयांचे पारितोषिक जाहीर करण्यात आले आहे. या यशाबद्दल काळवाडी ग्रामपंचायतीचे सर्व स्तरांतून अभिनंदन होत आहे.

हवामान

पुणे आणि शहर परिसरात आज आकाश निरभ्र असून किमान तापमान 33 तर कमाल तापमान 17 अंश सेल्सिअस नोंदवण्यात आलं. उद्याही हवामानात फारसा बदल नसल्याचा अंदाज हवामान विभागानं वर्तवला आहे.

हा होता आजचा पुणे वृत्तांत. उद्या पुन्हा भेटू विविधभारती पुणे केंद्रावर संध्याकाळी सहा वाजता ताज्या पुणे वृत्तांतमध्ये नमस्कार.